# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

दिनांक 18/06/2021 (शुक्रवार)

(सायंकाळ)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 17 कि. मी. अंतरावरील भिसी ते उमरेड रोड सालेभट्टी शिवार येथे दिनांक 16/06/2021 चे 19.00 वा. दरम्यान भिवापुर पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन भिवापुर पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एमएच–40/बी.एल – 0722 क्रमांकाच्या महिन्द्रा पिकअप गाडीचा चालक आरोपी नामे क्र. 1. अजय धनराज चौधरी वय 25 वर्ष रा नागतरोली ता भिवापुर 2. कुंदन गब्बर गोयल वय 20 वर्ष रा निष्ठी ता पवनी जि भंडारा यांना थांबवून चेक केले असता अवैधरीत्या व विनापरवाना एकूण 11 गाई कि. 44,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन वाहनासह एकूण किंमती 4,44,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस हवालदार उमेश झिंगरे, पो.स्टे. भिवापुर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11 (1) (ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5 (अ) (9) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, तसेच कलम 83/177 मोवाका.काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. प्रकाश चंगोले 9823380815 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अपर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी उमरेड श्री. भिमराव टेळे यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री यशवंत सोलसे, पोउपनि श्री प्रकाश चंगोले, पोहवा उमेश झिंगरे, पोशी संदेश रामटेके व चालक पोहवा रविन्द्र लेंडे यांनी केलेली आहे.





पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर